# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# मुंबई विभागीय मंडळ,वाशी नवी, मुंबई—४००७०३

महत्वाचे :—

परिपत्रक क्र. मुंबई/माध्य. परीक्षा/जून/जुलै २०२६ /प्रवेशपत्र / 2644 / दिनांक 09/०६/२०२६

विषय:— माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा (इ.१०वी ) जून/जुलै २०२६ मधील मौखिक व प्रात्यक्षिक परीक्षा साहित्य वाटपाबाबत व श्रेणी, मौखिक, अंतर्गत मूल्यमापन प्रात्यक्षिक परीक्षेचे ऑनलाईन गुणतक्ते व इतर साहित्य स्विकारणे बाबत...

संदर्भ:—क्र.रा.मं./परीक्षा—७/२३७१ दि०५/०६/२०२६ व जा.क्र. रा.मं./परीक्षा—६/२०१४/दि. १२मे २०२६

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, जून/जुलै २०२५ (इ. १०वी) परीक्षेचे वेळापत्रक, प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षेच्या उत्तरपत्रिका इत्यादी साहित्य वाटप **शुक्रवार, दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते ५:०० रोजी** वाशी येथील मंडळ कार्यालयात करण्यात येणार आहे. सदर साहित्य शाळेच्या प्रतिनिधी (लिपिक ) सोबत पत्र पाठवून मंडळ कार्यालयातून स्विकारण्यात यावे. साहित्य स्विकारण्यासाठी शाळेतील शिपाई अथवा चौकीदार यांना पाठवू नये. साहित्य स्विकारल्यानंतर ते आपल्याच शाळेचे असल्याबाबतची शहानिशा मंडळ कार्यालयातच करण्यात यावी. जून/जुलै २०२६ परीक्षेतील विदयार्थ्यांच्या बैठक क्रमांकाची यादी **online** पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याची नोंद घ्यावी.

**अ) प्रवेशपत्रा संबंधी सूचना खालील प्रमाणे—**

१. जून—जुलै २०२६ परीक्षेची प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर गुरूवार दिनांक ०८/०६/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदरचे प्रवेशपत्र शाळेच्या लॉगिंग मध्ये download करण्यात यावीत.

२. मंडळाकडे शाळेमार्फत विदयार्थ्यांची आवेदनपत्रे सादर केलेली संख्या आणि online प्रवेशपत्राची संख्या यांची पडताळणी करावी, त्यानुसार जर प्रवेशपत्र प्राप्त झाले नसेल तर आवेदनपत्र सादर केलेल्या पुराव्यासह (उदा. आवेदनपत्र सादर केल्याची स्थळप्रत (office copy) परीक्षा शुल्क भरल्याची रितसर पावती इत्यादी कागदपत्रे ) मंडळामध्ये आपल्या शाळेच्या प्रतिनिधीनी तात्काळ उपस्थित राहून त्याचे निरसन करावे. एकाच विद्यार्थ्याचे दोन बैठक क्रमांकाचे प्रवेशपत्र प्राप्त झाल्यास शाळेच्या पत्रामध्ये दोन्ही बैठक क्रमांक नमूद करून विद्यार्थ्यास दिलेले प्रवेशपत्र वगळून दूसरे प्रवेशपत्र शाळेच्या पत्रासह या कार्यालयात हस्तपोच जमा करण्यात यावे.

३. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (online) पध्दतीने प्रिंटींग करतांना विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेवू नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

४. ज्या आवेदनपत्रांना 'Paid' असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

६. प्रवेशपत्रावरील फोटो त्याच विद्यार्थ्याचा नसेल अथवा उमटलेला नसेल अशा प्रवेशपत्रावर संबंधित विद्यार्थ्याचा /विद्यार्थीनीचा फोटो लावून ( फोटो Attested करून ) संबंधित विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावे. व त्याची छायांकित प्रत प्रमाणित करून पत्रासह विद्यार्थी प्रविष्ट होणा—या संबंधित केंद्रास कळवावे तसेच त्याची एक प्रत मंडळ कार्यालयात त्वरित सादर करावी यासाठी कोणत्याही विद्यार्थ्यास शहानिशा न करता मंडळात परस्पर पाठवू नये.या आवेदनपत्रांना "Paid" असे "Status" प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे "Status date"होवून "Late Paid Status Admit Card"या "Option" व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. प्रवेशपत्रावर विद्यार्थ्याची स्वाक्षरी उमटलेली नसेल अथवा स्पष्टपणे दिसत नसेल तर संबंधित विद्यार्थ्याची स्वाक्षरी घेवून त्या प्रवेशपत्राची छायांकित प्रत मुख्याध्यापकांनी प्रमाणित करून दयावी. सदर प्रवेशपत्राची छायांकित प्रत काढून एक प्रत केंद्रास व एक प्रत मंडळास पाठवावी.

८. Online Hall Tiket असल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र गहाळ झाले असल्यास सदर विद्यार्थ्यास Online Hall Tiket व्दितीय प्रवेशपत्र ऑनलाईन घेवून त्या प्रवेशपत्रावर लाल शाईने व्दितीय प्रवेशपत्र असे लिहून मुख्याध्यापकांनी Attested करणे बंधनकारक आहे.

९. प्रवेशपत्र दुरूस्तीचे शुल्क सोबत जोडलेल्या विहित नमुना प्रतीसह पूर्ण भरून प्रवेशपत्राची प्रमाणित केलेली प्रत दि. १५/०६/२०२६ रोजी अथवा त्यापूर्वी मंडळ कार्यालयात पाठविण्यात यावी. शुल्काची रक्कम रू ५००/— अथवा त्यापेक्षा कमी असल्यास रोखीने सकाळी १०.३०ते ५.०० वाजेपर्यत किंवा चलनाव्दारे रक्कम सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यत स्किारण्यात येईल.

१०. मंडळाच्या लेखी पूर्व परवानगी शिवाय प्रवेशपत्रावरील केंद्रक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्यात येवू नये. शाळेने परस्पर असा बदल केल्यास संबंधित विद्यार्थ्यास बारकोड/प्रश्नपत्रिका उपलब्ध होणार नाही व यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास शाळाप्रमुख जबाबदार राहतील अथवा अशा विद्यार्थ्याचा निकाल राखीव ठेवण्यात येईल, याची नोंद घ्यावी

११. विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना नाव, विषय, माध्यम, जन्मतारीख, जन्मस्थळ, आधारकार्ड क्रमांक, विद्यार्थ्यांच्या बॅक खात्याची अद्ययावत माहिती इत्यादी बिनचूक भरणे अपेक्षित होते. तद्नंतरहीसंबंधित विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रामध्ये त्रुटी असल्यास त्या दुरूस्त्या ऑफलाईन प्रि—लिस्टमध्ये शाळांनी करणे अपेक्षित होते, तथापि अशादुरूस्त्या न झाल्याने प्रवेशपत्रामध्ये दुरूस्ती असल्यास त्या प्रवेशपत्रावर लाल शाईने दुरूस्ती दर्शवून त्या ठिकाणी मुख्याध्यापकांची प्रतिस्वाक्षरी करावी व एक प्रत प्रमाणित करून केंद्रसंचालकास पाठवावी व सदर प्रवेशपत्राची प्रमाणित केलेली एक प्रत सोबतच्या नमुना प्रपत्रामध्ये अचूक नोंद करून विहित शुल्कासह मंडळ कार्यालय, वाशी, नवी मुंबई येथे तात्काळ सादर करावी. तसेच याबाबतचे शुल्क विद्यार्थ्याकडून आकारले जाणार नाही, याची दक्षता घेवून असे शुल्क शाळांनी मंडळाकडे त्वरित भरावे.निकालापूर्वीच्या व निकालानंतरच्या दुरूस्तीसाठी दुरूस्ती शुल्क खालीलप्रमाणे आहे.

**अ) निकालपूर्वीच्या दुरूत्यांबाबत संदर्भ—रा.मं/परीक्षा—३/२४३६/दि.०९/०६/२०२३ रोजीचे पत्र.**

| अनु.क्र. | दुरूस्तीबाबतचा तपशील | दुरूस्ती शुल्क रूपये |
|---|---|---|
| १. | नावातील दुरूस्ती (फक्त नाव/वडिलांचे नाव/ आडनाव ) | रू २००/—प्रती दुरूस्ती |
| २. | संपूर्ण नावातील दुरूस्ती (फक्त नाव/वडिलांचे नाव/ आडनाव ) | रू २००/—प्रती विद्यार्थी |
| ३. | आईच्या नावातील दुरूस्ती | रू २००/—प्रती दुरूस्ती |
| ४. | आवेदनपत्रातील प्रत्येक दुरूस्तीसाठी ( विषय/माध्यम वगळून ) जन्मठिकाण जन्मदिनांक | रू २००/—प्रती दुरूस्ती |
| ५. | विषय दुरूस्ती, विषय सुट दुरूस्ती | रू २००/—प्रती विषय |
| ६. | संपूर्ण विषयाची दुरूस्ती | रू १०००/—प्रती विद्यार्थी |
| ७. | संपूर्ण विषयाची माध्यमाची दुरूस्ती | रू १०००/—प्रती विद्यार्थी |
| ८. | आवेदनपत्रे चुकीचे पाठविणे | रू १०००/—प्रती विद्यार्थी |
| ९. | एका विषयाच्या माध्यमाची दुरूस्ती | रू २००/—प्रती दुरूस्ती |
| १०. | प्रिलिस्ट विहित मुदतीनंतर पाठविणे | रू २००/—प्रती दुरूस्ती |

ब) निकालाच्या तारखापासून गणकयंत्र विभागास प्रमाणपत्राच्या दुरूस्त्या कळविण्यापर्यंत.

| अनु.क्र. | दुरूस्तीबाबतचा तपशील | दुरूस्ती शुल्क रूपये |
|---|---|---|
| 1) | श्रेणी प्रात्यक्षिक गुण/मौखिक गुण, अंतर्गत मूल्यमापन इ.गुण/श्रेणी निकालानंतर सादर करणे. | रू २००/–प्रती दिन |
| 2) | गुणतक्ते चुकीची सादर करणे. | रू२००/–प्रती गुण यादी |
| 3) | विषय सूट, श्रेणी दुरूस्ती, विषय बदल, प्रात्यक्षिक /मौखिक गुण अंतर्गत मूल्यमापनाचे गुण यातील कोणत्याही तरतुदीच्या दुरूस्तीसाठी प्रती तरतुद | रू२००/– (शाळा/ कनिष्ठमहाविद्यालयास दंड) |
| 4) | गुणपत्रिकेतील प्रत्येक दुरूस्तीसाठी (विद्यार्थ्याचेनाव / वडिलाचे नाव/ आडनाव /जन्मदिनांक /जन्मठिकाण /आईचे नाव यामधील कोणत्याही दुरूस्तीसाठी) | रू २००/–प्रति दुरूस्ती |
| 5) | अ. गुणपत्रिकेतील लॅमिनेशनसह नविन देणे.<br>ब. प्रमाणपत्र लॅमिनेशनसह नविन देणे. | रू २००/–<br>रू २००/– |

**क). श्रेणी/तोंडी**, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापनाचे गुण मार्च २०२६ च्या परीक्षेप्रमाणे **OMR Sheet** ऐवजी **Portal** वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत याबाबतची **Link** आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

१. श्रेणीतक्त्याच्या खालील बाजूस नमुद केलेल्या सूचना प्रथम वाचाव्यात. पडताळणी करूनच श्रेणी, श्रेणीतक्त्यात नमुद करावी.

२. अनिवार्य शालेय विषय SCHOOL SUBJECTS (COMPULSARY )

1) PHYSICAL EDUCATION – CODE NO- P1

2) जलसुरक्षा – CODE NO-R8

३. शालेय विकल्प विषयापैकी एक विषय अनिवार्य –– SCHOOL SUBJECTS (OPTIONAL ), SUBJECTS CODE NO- (INDEX NO. ) P2 TO P6 ,R7,V1,V2, V3

४. विशेष गरजा असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना आणि अशा विद्यार्थ्याव्यतिरिक्त इतर आजार असलेल्या विद्यार्थ्यांनी वैदयकिय अधिका–याचे प्रमाणपत्र मंडळास सादर करून सवलत घेतलेली आहे तसेच अस्थिव्यंग ०४, बहुविकलांग ०७, व सेरेबल पाल्सी १० या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण पी–१ या विषयास सूट दिलेली आहे,अशाच विद्यार्थ्यांच्या श्रेणीतक्त्यात शारीरिक शिक्षण पी–१ या रकान्यात श्रेणी H अशी दर्शविण्यात यावी. मात्र त्याच्या इतर विषयाची परीक्षा घेवून श्रेणी कळवावी.

५. पुनर्परीक्षांर्थीना पूर्वीच्या परीक्षेत A,B,C,श्रेणी प्राप्त असेल तर त्याच्या बैठक क्रमांकासमोर विषयाचा कोड नमुद करून श्रेणी E दर्शविण्यात यावी.

६. पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी ICT या विषयात अनुत्तिर्ण झालेले असतील, तर अशा विद्यार्थ्यांची R8 (जलसुरक्षा) या विषयाची पारीक्षा घेवून श्रेणीतक्त्यामध्ये श्रेणी दर्शवून मंडळास कळविण्यात यावे.

७. श्रेणीतक्त्यामध्ये जे शालेय वैकल्पिक विषय शाळाव्दारे दर्शविले जातात. अशा विषयासाठी मंडळ कार्यालयाची विषय मान्यता न घेताच ते विषय परस्पर शिकवून अशा विद्यार्थ्यांची परीक्षा घेवून ग्रेडलिस्टमध्ये तीन विषय व श्रेणी काही शाळांनी दर्शविलेली असल्याचे निदर्शनास येत असते. तरी शालेय वैकल्पिक विषयाबाबत मंडळाची मान्यता घेणे अनिवार्य आहे.

ड). मौखिक व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेच्या गुणपत्रिका व गुणदानाबाबत....

१. संयुक्त भाषा (composit language ) उदा. मराठी–हिंदी संयुक्त, मराठी–उर्दू संयुक्त मराठी –संस्कृत संयुक्त इत्यादी संयुक्त भाषा या विषयाची प्रत्येकी ५० गुणापैकी १० गुणाची मौखिक परीक्षा घ्यावयाची आहे. त्यानुसार १० पैकी प्राप्त केलेल्या गुणांची नोंद गुणतक्त्यात करावयाची आहे. त्यासाठी संयुक्त भाषेचे वेगवेगळे गुणतक्ते देण्यात आलेले आहे.

२. सर्व विद्यार्थ्यांची भाषा विषयाची तोंडी परीक्षा नवीन अभ्यासक्रमानुसारच घ्यावयाची असून पूर्ण १०० गुणांचे भाषा विषयामध्ये २० गुणाची मौखिक परीक्षा घेण्यात येवून २० पैकी प्राप्त झालेल्या गुणांची नोंद गुणतक्त्यात करावयाची आहे.

३. गणित सामाजिक शास्त्रे या विषयासाठी अनुक्रमे १०० गुणापैकी २० गुणाची अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा घेण्यात येवून २०पैकी प्राप्त झालेल्या गुणांची नोंद गुणतक्त्यात करावयाची आहे.

४. मार्च २०१८ व त्यापूर्वीच्या परीक्षेस जुन्या अभ्यासक्रमानुसार गणित व सामाजिक शास्त्रे या विषयामध्ये प्रविष्ठ होवून अनुत्तीर्ण झालेल्या अशा सर्व पुनर्पपरीक्षार्थी पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ठ व्हावे लागेल.

५. तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाच्या ऑनलाईन गुणपत्रिकेवर शाळेचा शिक्का उमटवून मुख्याध्यापकांनी स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

६. उपस्थितीपत्रक (फॉर्म नं–३अ) शाळेमध्ये जतन करून ठेवावेत, सदर तक्ते मंडळाकडे पाठवू नयेत.

७. महत्वाचे:– आयत्यावेळी विद्यार्थ्यांचा विषय बदल झाल्यास मौखिक /प्रात्य./अंतर्गत परीक्षेचे गुण देताना पूर्वीच्या विषयाचे मौखिक /प्रात्याक्षिक/ अंतर्गत गुण बदल झालेल्या विषयाला दर्शविले जातात, असे मंडळाच्या निदर्शनास आले आहे. तथापि असे गुण कोणत्याही परीक्षेस ग्राहय धरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

८. ऑनलाईन गुणतक्ते मंडळात जमा करतांना प्रतीच्या उजव्या बाजूस **final copy** असे लिहलेली प्रत जमा करावी **(Draft copy )** स्विकारली जाणार नाही.

९. ऑनलाईन गुणतक्त्याच्या खाली (प्रात्याक्षिक/मौखिक /श्रेणी ) देण्यात आलेल्या टिपमधील सूचनानुसार कार्यवाही करावी.

राज्य मंडळाच्या निर्देशानुसार गुणतक्ते व श्रेणीतक्ते भरण्यापूर्वी प्रथमत: कच्ची यादी तयार करावी. व ती यादी बरोबर असल्याची खातरजमा झाल्यानंतरच ऑनलाईन पध्दतीने गुण/श्रेणी नोंदविण्यात यावी.

प्रात्याक्षिक, मौखिक व श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाचे ऑनलाईन गुणपत्रक विषयनिहाय पेज, अनुक्रमानुसार क्रमाने लावून देण्यात यावे. सदर साहित्य एकाच पाकीटामध्ये सिलबंद स्वरूपात देण्यात यावे. (फॉर्म नं–३) विज्ञान आणि तंत्रज्ञान मौखिक, श्रेणी परीक्षेचे साहित्य जिल्हा निहाय खालील तारखांना सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत स्विकारण्यात येईल. आपल्या जबाबदार प्रतिनिधीमार्फत (शिपायाव्यतिरिक्त) मंडळ कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी.

| अनु. क्र. | जिल्हा | स्किारण्याचा वार व दिनांक |
|---|---|---|
| १ | ठाणे, (१६) रायगड (१७) पालघर(१८) | बुधवार दिनांक ०१/०७/२०२६ |
| २ | मुंबई (३१) (३२) (३३) | गुरूवार, दिनांक ०२/०७/२०२६ |

टिप– अत्यंत महत्वाचे

१. अतिरिक्त बैठक क्रमांकाने प्रविष्ठ होणा–या व विषय बदल असणा–या बैठक क्रमांकाच्या गुणाची नोंद अथवा गैरहजर विद्यार्थ्यांच्या नोंदी मंडळाने पाठविलेल्या **Extra Entry** च्या तक्त्यातच कळविण्यात यावी.तसेच सदर निर्धारित तारखेनंतर **Extra Entry** च्या गुणपत्रिका नियमित शुल्काने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे गुणतक्ते जमा करण्याच्या तारखेस मंडळात जमा कराव्यात. निर्धारित तारखेनंतर आलेले गुणतक्ते /श्रेणीतक्ते स्विकारले जाणार नाहीत.तसेच याबाबत दूरध्वनीव्दारे वारंवार सूचित केले जाणार नाही. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

२. परीक्षेचा कालावधी कमी असल्यानेच प्रवेशपत्रावरील दुरूस्त्या तसेच तोंडी, प्रात्यक्षिक अंतर्गत मूल्यमापन गुणपत्रिका, श्रेणीतक्ते **Extra Entry** गुणपत्रिका, श्रेणीतक्ते निर्धारित दिनांकास मंडळामध्ये जमा करावेत.

३. परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा, आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा **'out of turn'** ने आयोजित करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

४. जुलै २०२६ च्या माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेकरिता अतिविलंबाने भरलेल्या आवेदनपत्राबाबत शाळाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, अतिविलंब शुल्क/विशेष अतिविलंब शुल्क/अतिविशेष अतिविलंब शुल्क व ऑनलाईन फॉमची प्रत चलन परिशिष्ट अ प्रि–लिस्ट मुदतबाहय परिशिष्ट अ, इत्यादी कार्यालयात तात्काळ

जमा केल्यानंतरच ऑनलाईन प्रवेशपत्र आपणास उपलब्ध होतील अन्यथा प्रवेशपत्र उपलब्ध होणार नाहीत .अशा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर प्रवेशपत्रात निर्धारित केलेल्या केंद्रास विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक /नाव/विषय/माध्यम/याची माहिती केंद्रप्रमुखाना परीक्षेपूर्वी किमान ०२ दिवस अगोदर देण्यात यावी जेणे करून परीक्षा संचालनाच्या कामात अडथळा निर्माण होणार नाही.

सदर परिपत्रक आपल्या दप्तरी जतन करून ठेवण्यात यावे. मंडळाची सर्व परिपत्रके व इतर महत्वाची पत्रे राज्यमंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर **Home Page** वरून मुंबई विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून माहिती व कार्यवाहीसाठी संकेतस्थळाचा नियमित वापर करण्यात यावा, तसेच शासन व मंडळ संकेतस्थळ वेबसाईड दररोज पहावे.

(ज्योत्स्ना शिंदे पवार)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३

प्रति:— सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळाप्रमुख

प्रत योग्यत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :—

१. शिक्षणाधिकारी (माध्य ) ठाणे/ रायगड/पालघर जिल्हा
२. शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग मुंबई
३. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवाशी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/ जव्हार/ पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यता माध्यमिक शाळांना परिपत्रक सत्वर निदर्शनास आणावे.

C-1 / BR-SSC / A - 57

# Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
## MUMBAI DIVISIONAL BOARD, VASHI, NAVI MUMBAI - 400 703.

## S.S.C. EXAMINATION OF MARCH / JULY 202_

Proforma indicating errors in the List of Candidates only for
**Subject / Medium / Centre / Other**

School Index No. : | | | | | | |

Centre No. : _____

| Seat No. & Sr. No. of Application | WRONG POSITION (As per the Hall Ticket) | | | | CORRECT POSITION (As per the School Record) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Subject | Medium | Centre | Other | Subject | Medium | Centre | Other |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**Date :**

**Signature of H. M.**
**Stamp of the School**

C-1 / BR SSC / A-51

# M S BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION,

Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai - 400 703.

## CORRECTION LIST FOR NAME & DATE OF BIRTH

**Date :-** **SSC Exam March / July 202** **School Index No.** | | | | | | | |

| SEAT NO. | WRITE FULL NAME (BLOCK CAPITAL LETTERS) | | | | DATE OF BIRTH | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SURNAME | NAME | FATHER'S NAME | MOTHER'S NAME | D | D | M | M | Y | Y | Y | Y |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

IMPORTANT NOTE : i) If there is correction in name, write full Name.

ii) If there is correction in Mother's Name, write only Mother's Name.

iii) If there is correction in Date of Birth, write only Date of Birth.

**Signature of Head of the School and Stamp**

MUMBAI DIVISIONAL BOARD, VASHI, NAVI MUMBAI- 400703

S.S.C. EXAMINATION ----------

**BIRTH PLACE & OTHER**

SCHOOL INDEX NO.----------

| SEAT NO. | BIRTH PLACE | OTHER |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**SIGNATURE OF H.M.**

**STAMP OF THE SCHOOL**